Bharatiya Janata Party
C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point,
Mumbai 400 020 • Tel: 22022050

**प्रसिद्धीसाठी**

फेब्रुवारी ४, २००८

**हवाला किंग हसन अली आणि त्याचे लागेबांधे यांच्या संबंधातील कागदपत्रे उघड करा**

**-डॉ. किरीट सोमैय्या**

हवाला किंग हसन अलीच्या आस्थापनांवर सरकारी धाडीना १२ महिने होऊन गेले-

→ आयकर धाडी आणि प्रचंड हवाला व्यवहार उघडकीस

→ मॉरिशसमार्गे भांडवली बाजारातील व्यवहार

→ अपारदर्शक पीएन रुटमार्गे गुंतवणूकी

→ किकबॅक

→ बहुविध पारपत्रे

→ स्विस बँक खाते

→ आर्थिक फसवणूकीचे व्यवहार

आतापर्यंत काहीच बाहेर आले नाही.

भाजप नेता, डॉ. किरीट सोमैय्यानी आरोप केला कि सरकार तपासणी दाबून ठेवून हवाला किंग हसन अलीची सोय पहात आहे.
ही धक्कादायक बाब आहे कि, सर्व प्रमुख तपास एजन्सीज हसन अलीच्या, अतिरेकी निधीसहित सर्व लागेबांध्यांची चोकशी करीत असतानाहि एक वर्षानंतरहि एकाहि व्यक्तिला अटक करण्यात आली नाही किवा कोणाहि विरुद्ध कारवाई करण्यात आली नाही-

- अंमलबाजावणी संचालनालय
- केंद्रीय गुप्तचर विभाग
- भारतीय रिझर्व बँक
- सेबी
- प्रत्यक्ष कर विभाग
- विदेश मंत्रालय
- मुंबई आणि पुणे पोलीस
- पुणे, पाटणा, मुंबई, गुवाहाती आणि चंदिगढ येथील पारपत्र कार्यालये

**सरकार आणि तपासणी एजन्सीज, न्यायालये आणि जनता यांच्यापुढे सर्व माहिती उघड करीत नाहीत ही आश्चर्याची गोष्ट आहे.**

## हसन अली कुठे आहे ?

अंमलबजावणी संचालनालयानुसार, २००७ मध्ये ११ समन्स आणि ६ कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. पण हसन अली हजर झाला नाही किंवा सापडला नाही.

→ सरकारमधील कोण हसन अलीला संरक्षण देत आहे ?

→ हसन अलीच्या लॅपटॉपमध्ये ज्यांची नावे सापडली ते ५ राजकारणी कोण आहेत ?

→ १२ महिन्यात हसन अलीला अटक कां होऊ शकली नाही ?

→ दडवलेला पैसा, हवाला व्यवहार आणि युनायटेड बँक ऑफ स्वित्झर्लंडमधील रु. ४५७ कोटींचा व्यवहार याबाबत आयकर विभाग, आपबीआय, सेबी यांचे तपासणी निष्कर्ष आणि माहिती लोकांपुढे कां आणली जात नाही ?

→ न्यायालयाना अंधारात कां ठेवले जात आहे ?

**प्रसिद्धी सचिव**